अ) कोविड कालावधीमध्ये कोविड मुळे एक पालक/दोन्ही पालक गमावलेल्या मुलांकरीता कल्याणकारी योजना-

1. कोविड कालावधीमध्ये कोविड संसर्गामुळे दोन पालक गमावलेल्या किंवा एक पालक कोविड मुळे मयत झालेल्या मुलांच्या संगोपनाकरीता अर्थसहाय्य देणे.

| दोनही पालक गमावलेल्या बालकास मिळणारे अर्थसहाय्य | एक पालक गमावलेल्या बालकास मिळणारे अर्थसहाय्य |
|---|---|
| वय वर्ष 0 ते 5 - रू. 2000 प्रतिमहा | वय वर्ष 0 ते 5 - रू. 1000 प्रतिमहा |
| वय वर्ष 6 ते 10 - रू. 4000 प्रतिमहा | वय वर्ष 6 ते 10 - रू. 2000 प्रतिमहा |
| वय वर्ष 11 ते 18 - रू. 6000 प्रतिमहा | वय वर्ष 11 ते 18 - रू. 3000 प्रतिमहा |

2. कोविड कालावधीमध्ये 18 ते 21 वयोगटातील दोन पालक कोविडमुळे गमावलेल्या बेरोजगार युवक/युवतींना शैक्षणिक बाबी वगळून इतर बाबींच्या खर्चासाठी अर्थसहाय्य देणे.- रूपये 50,000 प्रतिवर्ष.

ब) कोविड कालावधीमध्ये कोविड मुळे पती मयत झालेल्या महिलांकरीता कल्याणकारी योजना

1. कोविड कालावधीमध्ये कोविड मुळे पती मयत झालेल्या महिलेस स्वयंरोजगारासाठी साहित्य संच उपलब्ध करुन देण्याकरिता अर्थसहाय्य करणे - व्यवसाय सुरु करण्यासाठी महिलेला संपूर्ण हयातीत एकदाच रक्कम रू.1.00 लक्ष पर्यंतचे अर्थसहाय्य. (दोन टप्प्यात)

2. कोविड कालावधीमध्ये कोविड मुळे पती मयत झालेल्या महिलेस अर्थसहाय्य देणे.- रू. 1.50 लक्ष अर्थसहाय्य.